# पुणे महानगरपालिका
# जाहिरात प्रकटन

पुणे महानगरपालिकेच्या अधीक्षक अभियंता (विद्युत) बिभागासाठी खालील अस्थायी पदावर सहा महिन्यांकरिता, करारपद्धतीने, एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचा हुद्दा | एकवट मासिक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता | एकूण पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|
| १. | बत्तीवाला | १६०८०/- | अ. महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण<br>ब. शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र | ३० | अजा ४, अज २, विजाअ १, भजब १, भजक १, भजड ० विमाप्र १, इमाव ५, खुला १५ |
| २. | बत्ती इन्स्पेक्टर | १७०८०/- | अ. महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण<br>ब. शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वीजतंत्री अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र | ३० | अजा ४, अज २, विजाअ १, भजब १, भजक १, भजड ०, विमाप्र १, इमाव ५, खुला १५ |

**वरील अस्थायी पदांकरिता खालील अटी व शर्ती राहतील**

१. वयोमर्यादा खुल्या वर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीच्या दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. वयाचे पुराव्यांसाठी जन्म दाखला, एस.एस.सी. दाखला, शाळा सोडल्याचा दाखला मूळ दाखला सोबत आणणे आवश्यक आहे.

२. उमेदवाराने अर्ज दाखल करताना अर्जावर स्वतःचा फोटो, वयाच्या पुराव्यासाठी १) जन्मदाखला/शाळा सोडल्याचादाखला/एस.एस.सी. चा दाखला २) आधारकार्डची प्रत, ३) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अंतिम परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

३. बत्तीवाला पदासाठी निवड यादी करताना शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभ्यासक्रमातील प्राप्त गुण व बत्ती इन्स्पेक्टर या पदासाठी वीजतंत्री अभ्यासक्रमातील प्राप्त गुण विचारात घेतले जातील.

४. महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५. सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरूपाचे आहे.

६. मागासवर्गीय उमेदवारांना जातीचा दाखला आवश्यक आहे. ज्या संवर्गासाठी जात पडताळणी असणे आवश्यक आहे, त्या संवर्गातील उमेदवारांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

७. निवड झालेल्या उमेदवारांना विहित नमुन्यात करारनामा करून त्यांना सहा महिन्यांकरिता नेमणूक दिली जाईल.

८. वरील पद हे अस्थायी स्वरूपाचे असल्याने या पदावर कायम स्वरूपाची नियुक्ती मागण्यास कोणताही हक्क.....

९. उपरोक्त पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित मा. खातेप्रमुख यांनी नेमून दिलेले कामकाज करावे लागेल.

१०. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारक करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास त्यांची उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

११. उमेदवाराने अर्जासोबत सर्व झेरॉक्स कागदपत्रे स्वयंसाक्षांकित करूनच जोडावीत. अन्यथा त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

१२. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रूजू होण्यापूर्वी एका महिन्याचे मानधनाची रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. सदर मानधन रक्कम कराराची मुदत संपल्यानंतर परत करण्यात येईल.

१३. बत्तीवाला/बत्ती इन्स्पेक्टर पदासाठी उपरोक्तप्रमाणे शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह दि. १५/०१/२०१८ ते दि. २२/०१/२०१८ या कालावधीत पुणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ pmc.Gov.in वर ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत.

स्वाक्षरी/-
उप आयुक्त (सा.प्र.)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/७२८
दि. १२/१/१८